Exh 1

175

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

निआमक मंडळाची २८ वी बैठक
दि २०।६ २००२

ठराव क्र. २८/६

"ठराव करण्यात येतो की, "द लेक सिटी कार्पोरेशन प्रा. लि. पुणे" यांच्या गिरीस्थान विकासाच्या अनुषंगाने मोसे उपखो-यात बंधारे बांधण्याच्या प्रस्तावास विहित शर्ती व अटींच्या अधीन राहून मा. मंत्री, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष यांनी मान्यता दिलेल्या प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. तथापि सदर कंपनीस शासनाचे विविध खात्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील. उदा. वन, प्रदूषण मंडळ इ. सदर प्रस्तावातील दोन बंधारे काळ नदीच्या पाणलोट क्षेत्रात असल्याने शासन / संबंधित मुख्य अभियंता यांची मंजूरी "द लेक सिटी कार्पोरेशन प्रा. लि. पुणे" यांनी घेणे आवश्यक राहिल."

ठराव क्र. २८/७

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभागाने परिपत्रक क्र.बिपाप्र/ १००१/७३३/२००१/सिं.व्य.(धो), दि.१६/२/२००२ अन्वये प्रसृत केलेले बिगरसिंचन पाणीपुरवठ्यासाठी करारनाम्याचा सुधारित नमुना व मार्गदर्शक तत्वे आवश्यक त्या फेरफारांनुसार महामंडळ क्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्पातील बिगरसिंचन पाणी पुरवठ्यासाठी लागू करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे व अनुषंगाने पूर्वीचे करारनामे रद्द करुन सुधारित नमुन्यानुसार करारनामे सुधारित करण्याबाबत व सर्व बिगरसिंचन पाणीवापर संस्थांसाठी पाणीवापर करारनाम्याचा एकच नमुना वापरण्यासाठी ~~दि.१/११/२००२~~ पासून मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. २८/८

"ठराव करण्यात येतो की, १) टेमघर प्रकल्प, ता. मुळशी, जि. पुणे, २) ल. पा. तलाव जेलगुडे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, ३) ल. पा. तलाव लकीकट्टी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर, ४) कोपबं निंबूत, ता. बारामती, जि. पुणे, या ४ प्रकल्पांच्या सुधारित अंदाजपत्रकांवर राज्य शासनाच्या वित्त व नियोजन विभागाचे अभिप्राय घेण्यासाठी संबंधित अंदाजपत्रके पाटबंधारे विभागाकडे पाठविण्यात यावीत. वित्त व नियोजन विभागाच्या अभिप्रायांना हरकत विचारात घेऊन सदर अंदाजपत्रकांना मा. अध्यक्षांच्या सहमतीने सुधारित प्रशासकिय मान्यता देण्यात यावी."

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म., पुणे